MHCH04-0005962025

State of Mah. Vs. Sagar Pardeshi

<u>**आदेश निशाणी क्रमांक ०३ वर**</u>

**(दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी पारित )**

अर्जदार सागर अशोक परदेशी राह. वाडे, तह. भडगाव, जि. यवतमाळ यांनी वरोरा पोलीस स्टेशन येथील अपराध क्र.४८०/२०२५ मध्ये ओपो रिनो १३ कंपनीचा मोबाईल सुप्रतनाम्यावर मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. सदरचा मोबाईल हा अर्जदाराच्या मालकीचा आहे. सदरच्या मोबाईलचा आयएमईआय क्रमांक ८६३२३३०७४७५८३९५ आहे. सदरचा मोबाईल अर्जदारास रोजच्या मजुरीच्या व कौटुंबीक कामाकरिता आवश्यक आहे. सदरचा मोबाईल जास्त काळ पोलिसांच्या ताब्यात ठेवल्यास तो निकामी होईल. त्याकरीता त्याने निशाणी ०४ च्या यादीप्रमाणे अर्जदाराने मोबाईल खरेदीचे बील व आधार कार्ड दाखल केलेले आहे.

०२. सदर प्रकरणात सरकारी अभियोक्ता यांचा अभिप्राय मागविण्यात आला. त्यानुसार त्यांनी निशाणी ११ वर त्यांचा अभिप्राय दाखल केला आहे. त्यांचा आक्षेप असा आहे की, सदरचा मोबाईल अर्जदाराला दिल्यास आरोपी पुन्हा अशाच प्रकारचे गुन्हे करण्यास मोबाईल वापरेल व मोबाईलच्या स्वरुपात बदल, विक्री, बक्षिस व हस्तांतर करेल. त्यामुळे अर्ज रदद करण्यात यावा. सदरच्या अर्जास सरकारी पक्षाने विरोध केलेला आहे. सदरचा मोबाईल आरोपीला दिल्यास तो पुन्हा अशाच प्रकारचे गुन्हे करण्यास मोबाईल वापरेल व मोबाईलच्या स्वरुपात बदल, विक्री, बक्षिस व हस्तांतर करेल. अर्जदाराने दाखल केलेले बील व जप्त असलेला मुददेमाल याच्या वर्णनात फरक आहे. जप्त केलेला मोबाईलचा ईएमआय नंबर ८६३२३३०७४७५८३९५ ओपो रिनो १३ मॉडेल नं. सीपीएच २६८९ असा आहे तर अर्जदाराने दाखल केलेल्या बीलमध्ये मोबाईलची कंपनी ओपो रिनो १३, ८-१२८ अशी

नमुद आहे. त्यामुळे सदरचा मोबाईल अर्जदारास देता येणार नाही.

०३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आपआपल्या कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

०४. सदरचा मोबाईल अर्जदारास रोजच्या वापराकरिता आवश्यक आहे. अर्ज रद्द केल्यास अर्जदाराचे आतोनात असे नुकसान होईल कारण खटला चालण्यास विलंब होईल व त्यामुळे मोबाईलची अवस्था खराब होईल. वि. सरकारी वकीलांचा आक्षेप की, सदरचा मोबाईल व आरोपीने दाखल केलेला बीलमधील मोबाईल वेगवेगळे आहेत त्यामुळे सुर्पुतनाम्यावर आरोपीला मोबाईल देता येणार नाही, हे मान्य करता येणार नाही कारण जप्त केलेला मोबाईल हा आरोपीकडूनच जप्त केलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ज्या व्यक्तीच्या कब्जातून जी वस्तु जप्त केली आहे त्या व्यक्तीच्या कब्जात पुन्हा ती वस्तु देण्यास काही एक हरकत नाही असा स्थापीत कायदा आहे. त्यामुळे मापक अटी व शर्तीवर सदरचा मूद्देमाल अर्जदाराच्या कब्जात देण्यास हरकत नाही. त्यामूळे अर्ज मंजुर करावा लागेल. त्याकरिता मी पूढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपराध क्र. ४८०/२०२५ मध्ये ओपो रिनो १३ कंपनीचा मोबाईल आयएमईआय क्रमांक ८६३२३३०७४७५८३९५ अर्जदार सागर अशोक परदेशी राह. वाडे, तह. भडगाव, जि. यवतमाळ यांना रु.५०,०००/- अक्षरी रु. पन्नास हजार रुपयाचे नुकसान भरपाईचे पत्र (Indemnity Bond) आधारे परत देण्यात यावी.

३. अर्जदारास असे निर्देशीत करण्यात येते की, सदर गुन्हयात जप्त मोबाईलमधील संपर्क क्रमांक व ईतर महत्वाची माहिती नष्ट करु नये.

४. अर्जदाराने सदर गुन्हयात जप्त मोबाईल ज्या स्थीतीत आहे त्याच स्थीतीत ठेवावा व त्यात कोणताही बदल करु नये किंवा सदर मोबाईल फोनच्या स्वरुपात कोणताही बदल करु नये.

५. अर्जदाराने सदर गुन्हयातील जप्त मोबाईल फोन कोणासही गहाण, विक्री, बक्षिस वा अन्य त-हेने हस्तांतरीत करु नये.

६. अर्जदाराने न्यायालयात पुराव्याकामी सदर मोबाईलची ज्या ज्या वेळी आवश्यकता भासेल त्या त्या वेळी न्यायालयात हजर करण्यास टाळाटाळ करू नये.

७. सदरचा मोबाईल गुन्हा करण्याकरिता वापरण्यात येवू नये ही अर्जदाराने काळजी घ्यावी.

Digitally signed by PRAVIN PANDURANG ABHANG
Date: 2026.04.01 13:30:40 +0530

दिनांकः ३१/०३/२०२६

**( प्र. पां. अभंग )**
अति.सत्र न्यायाधिश, वरोरा.